(17)

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर

दूरध्वनी 02342-225673 Gmail - sdowalwa@gmail.com

क्र.भूसंपादन/वशी- 431 /2023

दिनांक - 04/09/2023

प्रति ,

प्रकल्प संचालक,
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
मु.पो.उजळाईवाडी गट नं.37/ए अथायु हॉस्पिटल समोर,
जुनी एमआडीसी विभागीय कार्यालय जवळ,
ता.करवीर जि.कोल्हापूर

विषय - राष्ट्रीय महामार्ग क्र.48चे सहापदरीकरण
मौजे कासेगाव ता.वाळवा जि.सांगली येथील भूसंपादन प्रस्तावांमध्ये नुकसान भरपाईची रक्कम जमा करणेबाबत .

संदर्भ- आपलेकडील जा.क्र./भूसं/2/कावी/189/2023 दि.18/04/2023

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरून आपणास कळविणेत येते की, मौजे कासेगाव ता.वाळवा जि.सांगली येथील जमीन एस. आर. क्र.10/2023 अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 चे सहापदरीकरणासाठी या कार्यालयामार्फत संपादन करणेची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रस्तावामध्ये राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 नुसार आवश्यक ती कार्यवाही करून दि. 04.09.2023 रोजी या कार्यालयामार्फत अतिरिक्त अंतिम निवाडा घोषित करणेत आला आहे. तरी संपादित जमीनींची नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेसाठी आवश्यक असणारे अनुदान रक्कम रू 19884451/- व 1.5 टक्के आस्थापना फी ची रक्कम रु. 298267/- तसेच 1 टक्के कार्यालयीन खर्च रक्कम रू.198845/- असे एकूण रक्कम रु.20540188/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पाच लाख चाळीस हजार एकशे अठठ्याऐंशी फक्त) इतकी रक्कम तात्काळ या कार्यालयाकडे जमा करणेची दक्षता घेणेत यावी.सोबत अंतिम निवाडयाची प्रत जोडली आहे.

( श्रीनिवास अर्जुन)
उपविभागीय अधिकारी
वाळवा विभाग इस्लामपूर

अ.का. ना.तहसिलदार

Received
4/9/23
NHAI

C:\Users\Pawar\Desktop\भूसंपादन २०२३ -२४.docx

(B)

# उपविभागीय अधिकारी वाळवा,

# उपविभाग इस्लामपूर

# मौजे कासेगाव : अंतिम निवाडा

## राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४८ चे सहापदरीकरणासाठी

(कागल - सातारा) कि.मी. ५९२.२४० ते कि.मी. ७२५.००० चे

**भूसंपादन.**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम 3(G) अन्वये
नुकसान भरपाई निवाडा

**मौजे कासेगाव, ता. वाळवा जि. सांगली**

एसआर क्र. : ..10... /२०२३

मुल्यांकन दिनांक : २४.०४.२०२०

निवाडा दिनांक : ०४.०९.२०२३

गावाचे नांव : **कासेगाव**

तालुका : वाळवा

जिल्हा : सांगली

उपविभागीय अधिकारी वाळवा,

उपविभाग इस्लामपूर

# राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४८ चे सहापदरीकरणासाठी

(कागल - सातारा) कि.मी. ५९२.२४० ते कि.मी. ७२५.००० चे

**भूसंपादन.**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम 3(G) अन्वये नुकसान भरपाई निवाडा

**गावाचे नांव : मौजे कासेगाव, ता. वाळवा जि. सांगली**

| अ. क्र. | विषय | परिशिष्ट क्रमांक |
|---|---|---|
| १ | अंतिम निवाडा | -- |
| २ | संपादित जमिनीचा तपशिल | परिशिष्ट क्र. १ |
| ३ | खरेदी-विक्री व्यवहार तक्ता | परिशिष्ट क्र. २ |
| ४ | एकूण नुकसान भरपाई तक्ता | परिशिष्ट क्र. ३ |
| ५ | फळझाडाचे मुल्यांकन | परिशिष्ट क्र. ४ |
| ६ | बांधकामाचे मुल्यांकन | परिशिष्ट क्र. ५ |
| ७ | वनझाडाचे मुल्यांकन | परिशिष्ट क्र. ६ |
| ८ | विहीर,पाईपलाईन, बोअर इ.चे मुल्यांकन | परिशिष्ट क्र. ७ |
| ९ | ३-A आक्षेप अर्जाचा तपशिल | परिशिष्ट क्र. ८ |
| १० | ३-G (३) (४) सुनावणी अर्जाचा तपशिल | परिशिष्ट क्र. ९ |
| ११ | मुल्यांकन येणेवर | 'क' पत्रक |

# उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग, इस्लामपूर यांचे कार्यालय

## ४८-कागल-सातारा राष्ट्रीय महामार्ग एस/आर/१७/२०२३ दिनांक /०८/२०२३

वाचा :-

१) मा.आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील क्र.भू.सं/एसआर-३/५/२०१२ दि. ०२/०२/२०१२.

२) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(a) अन्वये महानिर्देशक, रस्ते विकास व अप्पर सचिव राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार नवीदिल्ली यांचेकडील अधिसूचना दि. १९/०६/२०१३.

३) प्रकल्प संचालक,राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर युनिट यांचेकडील NHAI /PIU/KOLHAPUR/S-K-NH-४८/LA/२०१८/१९६ दि. १५/०३/२०१८ प्रस्ताव.

४) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(A) (१) अन्वये महानिर्देशक, रस्ते विकास व अप्पर सचिव, राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील अधिसूचना दि. २७/०७/२०१८.

५) प्रकल्प संचालक, राष्ट्रीय राजमार्ग प्रधिकरण, कोल्हापूर युनिट यांचेकडील दि. २०/०७/२०१९ चे पत्र.

६) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(A) (१) अन्वये महानिर्देशक, रस्ते विकास व अप्पर सचिव, राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील अधिसूचना भारतीय राजपत्र का.आ.१३६० (अ) नुसार दि.२४/०४/२०२०. रोजी प्रसिध्द झाली.

कलम ३(A) (१) ची अधिसूचना दैनिक पुढारी (मराठी) आवृत्तीमध्ये व दैनिक इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी) आवृत्तीमध्ये दिनांक ०४.०६.२०२० रोजी प्रसिध्द झाली.

७) उपअधिक्षक, भूमी अभिलेख , वाळवा यांचे कडील मो. र. नं.४६४/ २०१८ दि. २९.०८.२०१८ अन्वये मोजणी व पत्र क्र जा.क. १२२३/क्रमांक /भूमापण/भूसंपादन/ तातडी मो. र. नं. ४७/ २०२१ दि. ०९.०४.२०२१ अन्वये संयुक्त मोजणी विवरणपत्र व संयुक्त मोजणी नकाशा प्राप्त.

८) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३D अन्वये महानिर्देशक, रस्ते विकास व अप्पर सचिव, राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील अधिसूचना भारतीय राजपत्र का.आ. ११२८ (अ) नुसार दि. १०.०३.२०२१ व ३-D अधिसूचना भारत राजपत्र क्र. का.आ. १६७५(अ) प्रसिद्ध दिनांक २२.०४.२०२१ रोजी प्रसिध्द झाली.

९) कलम ३D भारतीय राजपत्र का.आ. ११२८ (अ) नुसार दि. १०.०३.२०२१ ची अधिसूचना दैनिक लोकमत (मराठी) आवृत्तीमध्ये व दैनिक द फ्री प्रेस जरनल (इंग्रजी) आवृत्तीमध्ये दिनांक ०५.०४.२०२१ रोजी प्रसिध्द झाली व ३-D अधिसूचना भारत राजपत्र क्र. का.आ. १६७५(अ) दैनिक लोकमत (मराठी) आवृत्तीमध्ये व दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) आवृत्तीमध्ये दिनांक १३.०५.२०२१ रोजी प्रसिध्द झाली.

१०) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली. यांचेकडील आदेश क्र. भूसं/आर.आर./१३२५/२०२३ दि. २०/०२/२०२३ राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(a) अन्वये महानिर्देशक, रस्ते विकास व अप्पर सचिव राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील अधिसूचना क्र. का. आ. १२०९ (अ) दि . १४/०३/२०२३

११) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सांगली यांचेकडील पत्र जा.क्र. साबा(प)/वि.सां. / रेशा / १७९२/२०२२ दि. २५.०४.२०२२ अन्वये बांधकाम मूल्यांकन प्राप्त.

१२) उपवनसंरक्षक सांगली वन विभाग सांगली कुपवाड यांचेकडील पत्र क्र. जा.क्र./ ब /कक्ष -१०/जमीन /२०२०-२१/२६२५ सांगली कुपवाड दि. ०२.०२.२०२२ अन्वये वनझाडांचे मुल्यांकन प्राप्त.

१३) दुय्यम निबंधक श्रेणी - १ वाळवा यांचे कडील खरेदी-विक्री व्यवहार व रेडीरेकनर प्राप्त.

१४) उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ०२ सातारा यांचेकडील प्रस्ताव, पत्र क्र. भूसं/०२/कावी/१८९/२०२३ दि. १८/०४/२०२३ अन्वये प्राप्त.

---

उपविभागीय अधिकारी वाळवा ,उपविभाग इस्लामपूर.
**क्र.भूसं/२/एसआर/१७/२०२३-** कासेगाव/अंतिम निवाडा
दिनांक: **०४.०९.२०२३**

विषय :- राष्ट्रीय महामार्ग क्रं. ४८ चे सहापदरीकरणासाठी (कागल - सातारा) कि.मी. ५९२.२४० ते कि.मी. ७२५.००० चे भूसंपादन.
राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(G) अन्वये नुकसान भरपाई निश्चिती.
मौजे कासेगाव ता.वाळवा जि.सांगली

## * अंतिम निवाडा *

**(१) प्रस्तावना :-**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अधिसूचना अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ या राष्ट्रीय महामार्गावरील कागल ते सातारा हा महामार्ग प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण परियोजना, कोल्हापूर यांच्या अंतर्गत मोडतो. सदरची भूसंपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ या अधिनियमा नुसार करणेत आली आहे

राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन प्रस्ताव प्रस्तुत प्रकरणी भूसंपादन मोबदला निधी, न्यायालयीन खर्च तसेच तदअनुषंगिक इतर सर्व खर्च संपादन संस्था, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर देणेसाठी बंधनकारक राहील.

सदर भूसंपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ या अधिनियमा नुसार करणेत आली आहे. मा.आयुक्त पुणे, विभाग पुणे यांनी या कार्यालयाची राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ (कागल – सातारा रस्ता) चे सहापदरीकरणासाठी भूसंपादनाकामी सक्षम प्राधिकारी म्हणून क्र भूसं/आर.आर./१३२५/२०२३ दि.२०/०२/२०२३ अन्वये सक्षम प्राधिकारी तथा भूसंपादनअधिकारी,उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग, इस्लामपूर.या SÉÓ नेमणूक केली असून, त्याबाबतची अधिसूचना भारतीय राजमार्ग मंत्रालय व सडक परिवहन विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३(a) नुसार क्रमांक का.आ.१२०९(अ) दि. १४/०३/२०२३ अन्वये प्रसिध्द करणेत आलेली आहे.

उपरोक्त अधिसूचनेस अनुसरुन मौजे कासेगाव ता. वाळवा जि. सांगली येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ (कागल – सातारा रस्ता) साठी भूसंपादनाचा प्रस्ताव उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ०२ सातारा यांचेकडील प्रस्ताव पत्र क्र. भूसं/०२/कावी/१८९/२०२३दि. १८/०४/२०२० अन्वये या कार्यालयाकडे पाठविणेत आला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ चे सहापदरीकरण कि.मी. ५९२.२४० ते ७२५.००० या लांबीतील भूसंपादनाची कार्यवाही या कार्यालयामार्फत सुरु आहे.

**(२) संयुक्त मोजणी :-**

भूसंपादन प्रस्तावानुसार संपादन करण्यात येणाऱ्या जमिनीची संयुक्त मोजणी उपअधिक्षक भूमि अभिलेख, वाळवा व संपादन संस्थेचे प्रतिनिधी यांनी संयुक्तिकरित्या केली आहे. त्यानुसार उपअधिक्षक, भूमी अभिलेख , वाळवा यांचे कडील मो. र. नं.४६४/ २०१८ दि. २९.०८.२०१८ अन्वये मोजणी व पत्र क्र जा.क. १२२३/क्रमांक /भूमापण/ भूसंपादन/ तातडी मो. र. नं. ४७/ २०२१ दि. ०९.०४.२०२१ अन्वये संयुक्त मोजणी विवरणपत्र व संयुक्त मोजणी नकाशा या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. संयुक्त मोजणीचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात आला आहे.

| गावाचे नांव | मोजणी रजिस्टर नंबर |
|---|---|
| कासेगाव | ४६४ / २०१८ , ४७/२०२१ |

संपादित क्षेत्रातील बांधकामे, वनझाडे, फळझाडे, विहिरी, बोअरवेल / पाईपलाईन इत्यादींच्या नोंदी सक्षम अधिकाऱ्याने केलेल्या सर्व्हेप्रमाणे मान्य करण्यात आलेल्या आहेत.अशा सर्व बाबींचा समावेश संयुक्त मोजणी विवरणपत्रात करून त्याप्रमाणे नुकसान भरपाई निश्चित करण्यात येत आहे.

**संयुक्त मोजणी अहवालानुसार संपादित होत असलेले स.नं./ग.नं. व त्यामधील क्षेत्राचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | कलम ३-A नुसार क्षेत्र (चौ.मी.) का.आ. १३६०-(अ) दि. २४/०४/२०२० | | संयुक्त मोजणी नुसार क्षेत्र (चौ.मी.) मो. र. नं. ४६४/ २०१८ | | कलम ३-D नुसार क्षेत्र (चौ.मी.) का.आ. ११२८-(अ) दि. १०.०३.२०२१ | | कलम ३-D नुसार क्षेत्र (चौ.मी.) का.आ. १६७५-(अ) दि. २२.०४.२०२१ | | अतिरिक्त संपादन होणारे क्षेत्र (चौ.मी.) पहीला टप्पा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गट क्र | क्षेत्र | गट क्र | क्षेत्र | गट क्र | क्षेत्र | गट क्र | क्षेत्र | गट क्र | क्षेत्र |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | २२४१ / अ / १ | ७२० | २२४१ / अ / १ | ६०० | - | - | - | - | २२४१ / अ / १ | ६०० |
| | | | २२४१ / B | २०० | | | | | २२४१ / B | २०० |
| २ | २२४४ अ / १ | २११ | २२४४ | २०० | २२४४/अ/१ | २०० | - | - | - | - |
| ३ | २२४५ | ६८६ | २२४५ पै. | ६०० | २२४५ पै. | ४२५ | - | - | २२४५ पै. | १२९ |
| | | | | | २२४५ पै. | ५ | - | - | | |
| | | | | | २२४५ पै. | ५ | - | - | | |
| | | | | | २२४५ पै. | ५ | - | - | | |
| | | | | | २२४५ पै. | ३१ | - | - | | |
| ४ | २२४६ | १२० | २२४६ | १०० | २२४६ पै. | १०० | - | - | - | - |
| ५ | २७२३ | १६८० | २७२३ पै. | १२६९ | - | - | २७२३ पै. | १२६९ | - | - |
| ६ | २८३५ / १ | १६८ | २८३५ | १०५ | २८३५ / १ पै. | १०५ | - | - | - | - |
| ७ | २८३६ अ | ६०० | २८३६ अ | ५०० | - | - | - | - | २८३६ अ | ५०० |
| ८ | ३४८९ | ७२० | ३४८९ | ६०० | - | - | - | - | ३४८९ | ६०० |
| ९ | ३४९० अ | २४० | ३४९० अ | २०० | ३४९० अ पै. | २०० | - | - | - | - |
| | | | | ४५७४ | | १०७६ | | १२६९ | | २२२९ |
| वगळलेले क्षेत्र गट क्र ३४९० अ (महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ) | | | | २०० | ३४९० अ पै. | २०० | | ० | | ० |
| | | | | ४३७४ | | ८७६ | | १२६९ | | २२२९ |
| **एकूण** | | | | ४३७४ | | | २१४५ | | | २२२९ |

अ) वर नमुद केलेल्या तक्त्यामधील स्तंभ क्र.७ व ९ मधील संपादन होणा-या **२३४५ चौ.मी.** क्षेत्राचा कलम ३-A राजपत्र अधिसुचनाक्र. का. आ. १३६० (अ) दि. २४.०४.२०२० व कलम ३-D राजपत्र अधिसुचना क्र. ११२८ (अ) दि. १०.०३.२०२१ व कलम ३-D राजपत्र अधिसुचना क्र. १६७५-(अ) दि. २२.०४.२०२१ नुसार प्रसिध्द झालेले आहे. त्याचा या आदेशाव्दारे अंतिम निवाडा करण्यात येत आहे.

आ) वर नमुद केलेल्या तक्त्यामधील स्तंभ क्र. ११ मधील अतिरिक्त (पहीला टप्पा) संपादन होणा-या **२२२९** चौ.मी. क्षेत्रा बाबत प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग, प्राधिकरण यांचेकडून प्रस्ताव प्राप्त होताच राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये अतिरिक्त आदेशाबाबत भूसंपादनाची कार्यवाही नंतर करणेत येणार आहे.

## (३) भूसंपादनाची प्राथमिक अधिसूचना :-

राष्ट्रीय महामार्ग १९५६ कलम ३(A) मधील तरतूदीप्रमाणे मौजे कासेगाव ता. वाळवा जि. सांगली येथिल जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ च्या सहापदरीकरणांसाठी संपादित करण्याबाबत प्राथमिक अधिसूचना प्रसिध्द करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नवी दिल्ली यांना या कार्यालयाने केंद्र शासनाच्या सडक परिवहन व राजमार्ग विभागातील महानिर्देशक तथा अप्पर सचिव यांनी भारत सरकार, असाधारण राजपत्र भाग २ खंड ३ (२) मध्ये अधिसूचना क्र. का.आ.१३६० (अ) दिनांक २४/०४/२०२० रोजी प्रसिध्द केली आहे. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार सदर अधिसुचना २ स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणे बंधनकारक असलेने सदर प्राथमिक अधिसूचना २ स्थानिक वर्तमानपत्रात संपादित जमिनीच्या तपशिलासह खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| (अ) भारत सरकार, असाधारण राजपत्र भाग २ महामार्ग ३ (२) - | | दिनांक २४.०४.२०२० |
| (ब) वर्तमानपत्र प्रसिध्दी - | (१) दैनिक पुढारी (मराठी) | दिनांक ०४.०६.२०२० |
| | (२) दैनिक इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी) | दिनांक ०४.०६.२०२० |

## (४) प्राथमिक चौकशी :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ च्या कलम ३-A (१) अन्वये प्राथमिक क्षेत्राची अधिसूचना दिनांक २४.०४.२०२० रोजी प्रसिध्द झाल्यानंतर व सदरचे राजपत्र दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेनंतर २१ दिवसात भूसंपादनासंबंधी हितसंबंधित व्यक्तींना हरकती देणेबाबत मुदत देण्यात आली होती. बाधित खातेदारांनी उपस्थित केलेल्या हरकतीवर लेखी, तोंडी, म्हणणे व पुरावे दाखल करणेकामी या कार्यालयामार्फत रोजी सुनावणी घेणेत आली तद्नंतर उपस्थित केलेल्या हरकतींचा विचार करता सदरचे संपादन राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ (कागल – सातारा रस्ता) साठी संपादित करणेत येणार असून सदर संपादन सार्वजनिक हितासाठी अनिवार्य आहे. तसेच महामार्गाचे संपादन क्षेत्रामध्ये प्रविष्ठ सर्व बाबींचा योग्य मोबदला NH ACT १९५६ & RTFTLARR २०१३ नुसार सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २ यांचेमार्फत देण्यात येणार आहे. त्यास अनुसरून हरकत अर्ज प्राप्त तपशील परिशिष्ट क्र. ८ मध्ये देणेत आला आहे.

## (५) अंतिम अधिसूचना (कलम ३-D) :-

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३(A) अधिसुचनेनुसार प्राप्त झालेल्या संपादनाबाबतच्या हरकती अर्जावर कलम ३(C) अन्वये चौकशी करुन तसेच संपादन मंडळाचा स्वयंस्पष्ट अभिप्राय घेऊन, अहवाल महानिर्देशक रस्ते विकास व विशेष सचिव नवी दिल्ली यांना सादर केला असता सदर अहवाल पडताळणी करुन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३D (२) अन्वये संपादनाची अधिसूचना का.आ. ११२८(अ) दिनांक १०.०३.२०२१ व

का.आ. १६७५(अ) दिनांक २२.०४.२०२१ अन्वये राजपत्रात प्रसिध्द केली आहे. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार सदर अधिसुचना २ स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणे बंधनकारक असलेने सदर अधिसूचना २ स्थानिक वर्तमानपत्रात खालीलप्रमाणे प्रसिध्द करणेत आली आहे.

(अ) भारत सरकार, असाधारण राजपत्र भाग २ खंड ३ (२) अधिसूचना का.आ. ११२८(अ) दिनांक १०.०३.२०२१

| | | |
|---|---|---|
| (ब) वर्तमानपत्र प्रसिध्दी - | (१) लोकमत (मराठी) | दिनांक ०५.०४.२०२१ |
| | (२) दैनिक द फ्री प्रेस जरनल (इंग्रजी) | दिनांक ०५.०४.२०२१ |

(अ) भारत सरकार, असाधारण राजपत्र भाग २ खंड ३ (२) अधिसूचना का.आ. १६७५(अ) दिनांक २२.०४.२०२१

| | | |
|---|---|---|
| (ब) वर्तमानपत्र प्रसिध्दी - | (१) लोकमत (मराठी) | दिनांक १३.०५.२०२१ |
| | (२) दैनिक द फ्री प्रेस जरनल (इंग्रजी) | दिनांक १३.०५.२०२१ |

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम कलम ३-D (१) अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या व अंतिमरित्या संपादित करावयाच्या जमिनीचा तपशिल सोबत परिशिष्ट क्र. १ मध्ये देण्यात आलेला आहे.

**(६) कलम ३-D व ३-G नोटीस व चौकशी :-**

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३D (२) अन्वये संपादनाची अधिसूचना का.आ. ११२८(अ) दिनांक १०.०३.२०२१ व का.आ. १६७५(अ) दिनांक २२.०४.२०२१ अन्वये राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर व ती वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर अधिसूचनेतील सर्व जमिनी बोजा विरहित केंद्र शासनाकडे निहीत झाल्या आहेत व त्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत व नुकसान भरपाईबाबत असणारे दावे इत्यादी बाबत निवेदने करण्यासाठी हितसंबंधित सर्व व्यक्तींना तक्रारी /हरकती मागविणेची जाहीर नोटीस देण्यात आली होती. त्यानुसार या कार्यालयास प्राप्त झालेल्या हरकतीबाबत कलम ३G (३) व (४) नुसार नोटीसा रुजु करणेत येऊन प्राप्त झालेल्या हरकतीवर महाव्यवस्थापक (ता.) व प्रकल्प संचालक भा.रा.रा.प्रा. परियोजना इकाई, कोल्हापूर यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात आली आहे .सदर दिवशी प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांचा विचार नुकसान भरपाई निश्चित करताना करण्यात आला आहे. हरकतीवरील घेतलेल्या निर्णयाचा तपशिल परिशिष्ट क्र.९ मध्ये संक्षिप्तपणे देण्यात आलेला आहे.

**(७) नुकसान भरपाई निश्चिती बाबत संक्षिप्त अहवाल:-**

उपअधिक्षक, भूमी अभिलेख , वाळवा यांचे कडील मो. र. नं.४६४/ २०१८ दि. २९.०८.२०१८ अन्वये मोजणी व पत्र क्र जा.क. १२२३/क्रमांक /भूमापण/भूसंपादन/ तातडी मो. र. नं. ४७/ २०२१ दि. ०९.०४.२०२१ अन्वये संयुक्त मोजणी विवरणपत्र व नकाशा प्राप्त झालेनंतर कलम ३ (D) ची अधिसूचना का.आ. ११२८ (अ) दिनांक १०.०३.२०२१ व का.आ. १६७५(अ) दिनांक २२.०४.२०२१ प्रसिध्द झाली आहे. तसेच सदरची अधिसूचना वृत्तपत्रामध्ये दिनांक प्रसिध्द करून संबंधित गटधारकांना म्हणणे देणेबाबत जाहीर नोटीस देण्यात आली होती. तसेच प्राप्त झालेल्या संयुक्त मोजणी विवरणपत्रानुसार सदर संपादित जमिनीवरील फळझाडे/वनझाडे/ बांधकाम / बोअरवेल संदर्भात संबंधित यंत्रणाकडे मुल्यांकनाकामी पत्रान्वयेकळविण्यात आले. सदर यंत्रणाकडून प्राप्त मुल्यांकन अहवाल नुसार नुकसान भरपाई निश्चित करण्यात येत आहे. त्याचा तपशिल परिशिष्ट क्र. ३ मध्ये देण्यात आला आहे.

**नुकसान भरपाई निश्चिती :**

अ) राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ च्या सहापदरी करणासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन हे राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतूदीप्रमाणे करण्यात येत आहे. सदर संपादित जमिनी ह्या हायवे लगत असून

महामार्गालगतच्या जमिनीचे महत्त्व रस्त्यावरील सोई, सुविधा या दृष्टीकोनातून वाढत असल्याने त्यांचे मुल्यांकन निश्चित करताना महामार्गालगतच्या जमिनीचे शेती, रहिवासी, व्यापार व औद्योगिक वापर या दृष्टीकोनातून महत्त्व विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच अधिकृत व संभाव्य बिनशेती क्षमता यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

आ) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३G नुसार जमिनीची किंमत निश्चित करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहे. उक्त अधिनियमातील कलम ३G (७) (a) नुसार कलम ३A ची अधिसूचना ज्या दिनांकाला प्रसिध्द झाली आहे, त्यावेळचे जमिनीचे बाजारमुल्य विचारात विचारात घेण्यात यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मौजे कासेगाव येथील कलम ३-A ची अधिसूचना भारत सरकारच्या राजपत्रात दिनांक **२४.०४.२०२०** रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने या दिनांकावर जमिनीचे बाजारमुल्य निश्चित करण्यात आलेले आहे. कलम ३-A ची अधिसूचना प्रसिध्द झालेपासून मागील तीन वर्षाचे खरेदी-विक्री व्यवहार मुल्यांकनासाठी दुय्यम निबंधक वाळवा यांचेकडून उपलब्ध करून घेण्यात आलेले आहे. सदरचे व्यवहार परिशिष्ट क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहेत.

इ) परिशिष्ट क्र. २ मध्ये खरेदी-विक्रीचे जे व्यवहार उपलब्ध झाले आहे ते व्यवहार कोणत्या कारणासाठी झाले आहे. त्याचाही विचार किंमत निश्चित करताना केला आहे. कारण विशिष्ट गरजेसाठी जमिन खरेदी करता गरज पूर्ण होईल अशीच जमिन खरेदी करावी लागते. (उदा. विहिरीसाठी, बोअर घेण्यासाठी, वस्ती किंवा शेताकडे जाण्यासाठी रस्ता, घर बांधणेसाठी इ.) त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणासाठी लगतच्या विशिष्ट गटातील गरजेइतकी जमिन संपादित करावी लागते. त्यामुळे विशिष्ट जमिन हा मुद्दाही मुल्यांकन करताना लक्षात घेतलेला आहे.

ई) संपादनाखालील जमिनीचे मागील तीन वर्षाचे पिकपाणी संदर्भात मौजे कासेगाव येथील तलाठी यांचेकडून ७/१२ उतारा प्राप्त करून घेण्यात आले आहे. संपादन जमिनी महामार्गालगत असल्याने व त्यामुळे सर्व जमिनीची विकास क्षमता सारखीच असल्याने संपादित जमिनीची ग्रुपनिहाय, जिरायत, बागायत व हंगामी बागायत अशी वर्गवारी न करता सर्व जमिनींना महामार्गालगत जमिनी याचा विचार करणेत आला आहे.

उ) राष्ट्रीय महामार्गासाठी जमिनी भूसंपादन करीत असताना राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३G (७) (a) नुसार जमिनीचे बाजारमुल्य ठरविणेसाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (RFCTLARR Act, २०१३ म्हणजेच नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३) मधील कलम २६ ते ३० मधील तरतूदी व शेड्युल I मधील तरतूदी व ह्या दिनांक ०१.०१.२०१५ पासून लागू करणेत आले आहे. त्यानुसार प्रस्तुत कलम ३G चे मुल्यांकन आदेशामध्ये भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३) मधील कलम २६ ते ३० व शेड्युल I मधील तरतूदी तसेच राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३G मधील तरतूदी विचारात घेवून नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे.

**(८) खरेदी-विक्री व्यवहारा प्रमाणे जमीनीचे दर:-**

संपादनाखालील जमिनीचे मुल्यांकन करताना त्या गावातील कलम ३-A ची क्षेत्राची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २४.०४.२०२० त्यापूर्वीच्या ३ वर्षापपर्यंतच्या (२४.०४.२०१७ ते २४.०४.२०२०) खरेदी-विक्रीचे व्यवहार दुय्यम निबंधक, वाळवा यांचेकडून उपलब्ध करून घेण्यात आले आहेत .

सदरचे व्यवहार परिशिष्ट क्र. २ मध्ये दर्शविले असून त्याची संख्या ३६ इतकी आहे . सदरचे खरेदि-विक्री व्यवहार खाली दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहेत.

**मौजे कासेगाव, ता. वाळवा येथील खरेदी विक्री व्यवहार**
**मुल्यांकन दिनांक: २४.०४.२०२०**

| अ. क्र. | गट क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | खरेदीची किंमत | खरेदी दिनांक | मुल्यांकन दिनांक | दिवस | प्रति हेक्टरी किंमत | प्रति आर किंमत | प्रति चौ.मी. किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ८८२/१ | १२७५ | १५९५००० | ४/१२/२०१८ | ४/२४/२०२० | ७४३ | १२५०९८०४ | १२५०९८ | १२५१ |
| २ | १६१३ | ११५४ | ५००००० | ९/१५/२०१८ | ४/२४/२०२० | ५८७ | ४३३२७५६ | ४३३२८ | ४३३ |
| ३ | ३१०८ | १५०० | ५५०००० | ८/१३/२०१८ | ४/२४/२०२० | ६२० | ३६६६६६७ | ३६६६७ | ३६७ |
| ४ | २२०६ & २२०८& २१९० | ३२३४ | १०५०००० | ८/११/२०१९ | ४/२४/२०२० | २५७ | ३२४६७५३ | ३२४६८ | ३२५ |
| ५ | २७६६, २७७१ | ६३६७ | १८४०००० | १/३/२०१९ | ४/२४/२०२० | ४७७ | २८८९९०१ | २८८९९ | २८९ |
| ६ | १३११/१ | २२५० | ६१५००० | ४/१८/२०१७ | ४/२४/२०२० | ११०२ | २७३३३३३ | २७३३३ | २७३ |
| ७ | ३०५२ | ११०० | ३००००० | ३/१२/२०१८ | ४/२४/२०२० | ७७४ | २७२७२७३ | २७२७३ | २७३ |
| ८ | ३१०७ | २६०० | ५००००० | ३/१९/२०१९ | ४/२४/२०२० | ४०२ | १९२३०७७ | १९२३१ | १९२ |
| ९ | १७८० B | ९८०० | १४२१००० | २/२२/२०१८ | ४/२४/२०२० | ७९२ | १४५०००० | १४५०० | १४५ |
| १० | १७८० A | ४९०० | ७१०५०० | २/२२/२०१८ | ४/२४/२०२० | ७९२ | १४५०००० | १४५०० | १४५ |
| ११ | ११२८ , ११३९ | ९९६ | ४५०००० | ८/२७/२०१८ | ४/२४/२०२० | ६०६ | ४५१८०७२ | ४५१८१ | ४५२ |
| १२ | ३०५२ | ९०० | ३६८००० | ३/१३/२०१८ | ४/२४/२०२० | ७७३ | ४०८८८८९ | ४०८८९ | ४०९ |
| १३ | २८५२/२ | ७५० | १२५०००० | १/१/२०१९ | ४/२४/२०२० | ४७९ | १६६६६६६७ | १६६६६७ | १६६७ |
| १४ | ३४६३ | ६४० | १०७०००० | ५/१६/२०१८ | ४/२४/२०२० | ७०९ | १६७१८७५० | १६७१८८ | १६७२ |
| १५ | २२४७ | ६०० | १११०००० | २/११/२०१९ | ४/२४/२०२० | ४३८ | १८५००००० | १८५००० | १८५० |
| १६ | २८६३/A | ३५० | ६००००० | ९/७/२०१८ | ४/२४/२०२० | ५९५ | १७१४२८५७ | १७१४२९ | १७१४ |
| १७ | ३४६४ | २३७ | ४००००० | ६/३०/२०१८ | ४/२४/२०२० | ६६४ | १६८७७६३७ | १६८७७६ | १६८८ |
| १८ | CTS १२१५,१२१६,१२१७, ११४१, ११३९ | २२६ | ३९०००० | ५/२१/२०१९ | ४/२४/२०२० | ३३९ | १७२५११०६६ | १७२५११ | १७२५ |
| १९ | २८९६ | २०० | ३५०००० | ४/६/२०१७ | ४/२४/२०२० | १११४ | १७५००००० | १७५००० | १७५० |
| २० | २९५९ | २०० | ३७०००० | ८/१८/२०१८ | ४/२४/२०२० | ६१५ | १८५००००० | १८५००० | १८५० |
| २१ | २२३७ | १७० | २८५००० | ८/६/२०१८ | ४/२४/२०२० | ६२७ | १६७६४७०६ | १६७६४७ | १६७६ |
| २२ | २९२९ | १४४ | २५०००० | ७/२६/२०१८ | ४/२४/२०२० | ६३८ | १७३६१११ | १७३६११ | १७३६ |
| २३ | २८७१/A/१ | १२३ | १०००००० | ५/१७/२०१८ | ४/२४/२०२० | ७०८ | ८१३००८१३ | ८१३००८ | ८१३० |
| २४ | CTS २८६७/२ | १०० | २७५००० | १/२/२०१९ | ४/२४/२०२० | ४७८ | २७५००००० | २७५००० | २७५० |
| २५ | २९२३ | १०० | १६६००० | ८/२८/२०१८ | ४/२४/२०२० | ६०५ | १६६००००० | १६६००० | १६६० |
| २६ | CTS १२८० | ९५.५ | २००००० | १/१/२०१९ | ४/२४/२०२० | ४७९ | २०९३४८३२ | २०९३४८ | २०९४ |

| अ. क्र. | गट क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | खरेदीची किंमत | खरेदी दिनांक | मुल्यांकन दिनांक | दिवस | प्रति हेक्टरी किंमत | प्रति आर किंमत | प्रति चौ.मी. किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| २७ | ११४ | ९४.३ | ४५३००० | ६/२८/२०१९ | ४/२४/२०२० | ३०१ | ४८०३८१७६ | ४८०३८२ | ४८०४ |
| २८ | CTS १०६८ | ९३.९ | १६५००० | ९/१४/२०१८ | ४/२४/२०२० | ५८८ | १७५६६२७३ | १७५६६३ | १७५७ |
| २९ | ३१४ | ९३.८ | ७७५००० | ४/१/२०१९ | ४/२४/२०२० | ३८९ | ८२६६६६६७ | ८२६६६७ | ८२६७ |
| ३० | १०६८ | ९२.९ | १६३००० | ८/१६/२०१८ | ४/२४/२०२० | ६१७ | १७५४००८४ | १७५४०१ | १७५४ |
| ३१ | CTS २९३९ | ६५ | ११०००० | ६/१८/२०१९ | ४/२४/२०२० | ३११ | १६९२३०७७ | १६९२३१ | १६९२ |
| ३२ | CTS ११७० | ५९.४ | ५७५००० | ६/९/२०१९ | ४/२४/२०२० | ३२० | ९६८०१३४७ | ९६८०१३ | ९६८० |
| ३३ | CTS ४०९ | ३५.९ | ६०००० | २/२८/२०१८ | ४/२४/२०२० | ७८६ | १६७१३०९२ | १६७१३१ | १६७१ |
| ३४ | CTS १८९७ | ३३.६ | ६०००० | ८/४/२०१८ | ४/२४/२०२० | ६२९ | १७८८३७५६ | १७८८३८ | १७८८ |
| ३५ | CTS १३६७ | २४.१ | २२०००० | २/२/२०१९ | ४/२४/२०२० | ४४७ | ९१२४८४४५ | ९१२४८४ | ९१२५ |
| ३६ | CTS २१३६ | ५.९ | ११००० | ४/१७/२०१८ | ४/२४/२०२० | ७३८ | १८६४४०६८ | १८६४४१ | १८६४ |

वर तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे मौजे कासेगाव गाव, ता. वाळवा येथील कलम ३-A चे दिनांकापासून ३ वर्षापूर्वीचे व्यवहार नमूद केलेले आहेत. वरील उपलबद्ध व्यवहारांपैकी अ. क्र. ११ ते ३६ असे एकूण २६ व्यवहार हे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे असलेने सदर व्यवहार मूल्यांकना करिता विचारात घेणेत आलेले नाहीत . उर्वरित मूल्यांकन योग्य व्यवहार खालील तक्तयामधें नमूद केलेले आहेत.

| अ. क्र. | गट क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | खरेदीची किंमत | खरेदी दिनांक | मुल्यांकन दिनांक | दिवस | प्रति हेक्टरी किंमत | प्रति आर किंमत | प्रति चौ.मी. किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ८८२/१ | १२७५ | १५९५००० | ४/१२/२०१८ | ४/२४/२०२० | ७४३ | १२५०९८०४ | १२५०९८ | १२५१ |
| २ | १६१३ | ११५४ | ५००००० | ९/१५/२०१८ | ४/२४/२०२० | ५८७ | ४३३२७५६ | ४३३२८ | ४३३ |
| ३ | ३१०८ | १५०० | ५५०००० | ८/१३/२०१८ | ४/२४/२०२० | ६२० | ३६६६६६७ | ३६६६७ | ३६७ |
| ४ | २२०६ & २२०८& २११० | ३२३४ | १०५०००० | ८/११/२०१९ | ४/२४/२०२० | २५७ | ३२४६७५३ | ३२४६८ | ३२५ |
| ५ | २७६६, २७७१ | ६३६७ | १८४०००० | १/३/२०१९ | ४/२४/२०२० | ४७७ | २८८९९०१ | २८८९९ | २८९ |
| ६ | १३११/१ | २२५० | ६१५००० | ४/१८/२०१७ | ४/२४/२०२० | ११०२ | २७३३३३३ | २७३३३ | २७३ |
| ७ | ३०५२ | ११०० | ३००००० | ३/१२/२०१८ | ४/२४/२०२० | ७७४ | २७२७२७३ | २७२७३ | २७३ |
| ८ | ३१०७ | २६०० | ५००००० | ३/१९/२०१९ | ४/२४/२०२० | ४०२ | १९२३०७७ | १९२३१ | १९२ |
| ९ | १७८० B | ९८०० | १४२१००० | २/२२/२०१८ | ४/२४/२०२० | ७९२ | १४५०००० | १४५०० | १४५ |
| १० | १७८० A | ४९०० | ७१०५०० | २/२२/२०१८ | ४/२४/२०२० | ७९२ | १४५०००० | १४५०० | १४५ |

वर तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे मौजे कासेगाव, ता. वाळवा येथील कलम ३-A चे दिनांकापासून ३ वर्षापूर्वीचे मूल्यांकन योग्य व्यवहार नमूद केलेले आहेत. तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जास्त किंमतीचे व्यवहार म्हणजेच एकूण व्यवहारापैकी जास्त किंमतीचे ५०% व्यवहार नुकसान भरपाई निश्चित करणेकामी विचारात घेणेत आले आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | गट क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | खरेदीची किंमत | खरेदी दिनांक | मुल्यांकन दिनांक | दिवस | प्रति हेक्टरी किंमत | प्रति आर किंमत | प्रति चौ.मी. किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ८८२/१ | १२७५ | १५९५००० | ४/१२/२०१८ | ४/२४/२०२० | ७४३ | १२५०९८०४ | १२५०९८ | १२५१ |
| २ | १६१३ | ११५४ | ५००००० | ९/१५/२०१८ | ४/२४/२०२० | ५८७ | ४३३२७५६ | ४३३२८ | ४३३ |
| ३ | ३१०८ | १५०० | ५५०००० | ८/१३/२०१८ | ४/२४/२०२० | ६२० | ३६६६६६७ | ३६६६७ | ३६७ |
| ४ | २२०६ & २२०८& २१९० | ३२३४ | १०५०००० | ८/११/२०१९ | ४/२४/२०२० | २५७ | ३२४६७५३ | ३२४६८ | ३२५ |
| ५ | २७६६, २७७१ | ६३६७ | १८४०००० | १/३/२०१९ | ४/२४/२०२० | ४७७ | २८८९९०१ | २८८९९ | २८९ |
| एकुण | | | | | | | २६६४५८८१ | | २६६५ |
| सरासरी २६६५/ ५= ५३३ /- प्रति चौ.मी. | | | | | | | | | |

निवडण्यात आलेल्या व्यवहाराची सरासरी प्रति हेक्टरी रक्कम रु. **२६६४५८८१/ ५ = ५३२९१७६** इतकी येते म्हणजेच प्रति **चौ.मी. ५३३**/- इतका दर येतो.

**(९) नवीन भूसंपादन कायदा २०१३ चे अनुसूची - १ नुसार गुणक (Factor) लागू करणेबाबत :**

नवीन भूसंपादन कायदा २०१३ मधील अनुसूची १ अनुसार संबंधित राज्य शासनाने राजपत्रीय अधिसूचनेद्वारे सर्व प्रकल्पांसाठी लागू केलेल्या गुणक (Factor) राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित क्षेत्रासाठी लागू करणेत आले आहे. मौजे कासेगाव ता वाळवा या भूसंपदनाची अधिसूचना हि दिनांक २४.०४.२०२० असल्याने दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ ची सुधारित अधिसूचना यास लागू होणार नाही . सबब २ गुणक देणेत आला असून सदर गुणकाचा वापर नुकसान भरपाई निश्चिती करण्यासाठी करणेत आलेला आहे.

**(१०) मौजे कासेगाव, ता. वाळवा येथील सन २०२०-२१ चे शिघ्रसिद्धगुणकानुसार वार्षिक मुल्यदर**

नोंदणी व मुद्रांक विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील सन २०२०-२०२१ चे जमीनीचे बाजारमुल्य दर-तक्त्यामध्ये गावातील गट नंबरच्या जमीनीच्या विभागवार तपशिल नुसार दर नमुद केले आहेत. त्यानुसार संपादनाखालील गट नंबरचे दर खाली तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे आहेत .

| अ. क्र. | विभाग, क्रमांक | शिघ्रसिध्द गणकानुसार जमीनीचे दर |
|---|---|---|
| १ | ६.१ हायवेवरील विकसनक्षम जमिनी<br>गट नंबर २७२३ पै., | १२५०/- प्रती चौ.मी. |
| २ | ९.० अधिकृत विनशेती झालेल्या जमिनी<br>९.१ गावठाण परिघस्त क्षेत्रातील हायवे संमुख जमिनी गट नंबर २२४४ पै., २२४५ पै.,२८३५ पै., | ३१३०/- प्रती चौ.मी. |
| ३ | ११.० विनशेती संभाव्यता असलेल्या जमिनी<br>११.१ गावठाण परिघस्त क्षेत्रातील हायवे संमुख जमिनी गट नंबर २२४६ पै. | १८८० /- प्रती चौ.मी. |
| ४ | ११.२ गावठाण परिघस्त क्षेत्रातील हायवे संमुख जमिनी व्यतिरिक्त उर्वरित जमिनी गट नंबर ३४९०पै., | १७०० /- प्रती चौ.मी. |

मौजे कासेगाव, **ता.** वाळवा येथील सहापदरी करणाचे भूसंपादन प्रक्रिया ही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये चालू आहे. या कायद्यातील कलम ३ (G) (७) (a) नुसार कलम ३A ची अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकाला जमिनीचे बाजारमुल्य विचारात घेण्यात यावे अशी तरतूद आहे. परंतु बाजारमुल्य निश्चित कसे करावे याबाबत निश्चित प्रक्रिया कायद्यात नमूद नाही. १ जानेवारी २०१५ पासून भारत सरकारने १८९४ चा भूसंपादन कायदा Repeal करून नवीन कायदा The Right to fair compensation and Transparenency in Land Acquisition, Rehabilition and Resettlement Act, २०१३ कायदा अंमलात आणलेला आहे. या कायद्यातील कलम २६ मध्ये खरेदी-विक्री व्यवहाराप्रमाणे बाजारमुल्य निश्चित करण्याची पद्धत नमूद केलेली आहे. त्यातील कलम २६ (a) इंडियन स्टॅम्प अॅक्ट १८९९ अन्वये किंमत निश्चित केली असेल (b) समतूल्य जमिनीचे शेजारच्या गावातील किंवा सभोवतालचे खरेदी-विक्री व्यवहार यानुसार बाजारमुल्य मुल्यांकन दिनांकाला निश्चित करावे. तसेच जी रक्कम अत्याधिक असेल ती किंमत निश्चित करणेबाबची तरतूद आहे.

**(११) मूळ दर :-**

शासन निर्णय शुद्धीपत्रक क्र. संकिर्ण-०३/२०१८/प्र.क्र.४३ (भाग-१)/अ-२ दिनांक १० सप्टेंबर २०१८ अन्वये भूसंपादन अधिनियम, २०१३ (RFCTLARR Act, २०१३) मधील कलम २६ ते ३० च्या तरतूदीप्रमाणे जमिनीचा मोबदला परिगणित बाजारमुल्य निर्धारित करताना व निश्चित करताना कलम २६(१) (a) साठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ६९ अन्वये विहीत केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार निर्गमित केवळ वार्षिक बाजारमुल्य दराचा आधार घेऊन करण्यात यावी. यामध्ये खरेदी-विक्री व्यवहार जास्त रकमेचे असल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावे असे नमूद नमूद केले आहे. तसेच भूसंपादन अधिनियम, २०१३ (RFCTLARR Act, २०१३) मधील कलम २६ (१) (a) मध्ये भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ (१८९९ चा २) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही असल्यास बाजारमुल्य किंवा जवळच्या गावामध्ये किंवा निकट परिसरातील क्षेत्रामध्ये असलेल्या तत्सम प्रकारच्या जमिनीची सरासरी विक्री किंमती यापैकी जी रक्कम अत्याधिक असेल ती किंमत निश्चित करणेबाबत निर्णय झाला आहे.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शिघ्रसिद्धगणकातील दर व खरेदी-विक्री व्यवहाराआधारे येणारा दर यापैकी जो दर जादा असेल तो विचारात घेणे आवश्यक आहे. मुद्दा क्र. ८ नुसार खरेदी-विक्री व्यवहाराप्रमाणे सरासरी दर रु. **५३३ /- प्रति चौ. मी.** इतका येतो. तसेच हायवेलगत असलेल्या जमिनींना **१२५०/- प्रति चौ.मी.** इतका दर देणेत आलेला आहे.

संपादित होणाऱ्या जमिनीची खरेदी-विक्री व्यवहारानूसार बाजारमुल्य व शिघ्रशिध्द गणक २०२०-२०२१ मध्ये दर्शविणारे बाजार मुल्य याबाबत तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संपादित होणारे गट नंबर | खरेदि-विक्री नुसार येणारा सरासरी दर प्रति चौ.मी. | शिघ्रसिध्द गणकानुसार जमीनीचा दर प्रति चौ.मी. | निवाडयासाठी मंजुर करणेत आलेले अंतिम दर प्रति चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | ६.१ हायवेवरील विकसनक्षम जमिनी<br>गट नंबर २७२३ पै., | ५३३/- | १२५० /- | १२५० /- |
| २ | ९.० अधिकृत बिनशेती झालेल्या जमिनी<br>९.१ गावठाण परिघस्त क्षेत्रातील हायवे संमुख जमिनी गट नंबर २२४४ पै., २२४५ पै.,२८३५ पै., | ५३३/- | ३१३०/- | ३१३०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ११.० बिनशेती संभाव्यता असलेल्या जमिनी<br>११.१ गावठाण परिघस्त क्षेत्रातील हायवे संमुख जमिनी गट नंबर २२४६ पै. | ५३३/- | १८८० /- | १८८० /- |
| ४ | ११.२ गावठाण परिघस्त क्षेत्रातील हायवे संमुख जमिनी व्यतिरिक्त उर्वरित जमिनी गट नंबर ३४९०पै., | ५३३/- | १७०० /- | ० /- |

संपादनगटातील हायवेवरील विकसनक्षम जमिनीसाठी खरेदी विक्री नुसार आलेल्या दराचा विचार न करता शिघ्रसिध्द गणकानुसार गट नंबर २७२३ ना हायवे लगत दर रु. **१२५०/- प्रति चौ.मी.** प्रस्तावित केला आहे तसेच गट नंबर २२४४ पै., २२४५ पै.,२८३५ पै. ना दर रु. **३१३०**/- प्रति चौ.मी. प्रस्तावित केला आहे तसेच गट नंबर २२४६ पै., ना दर रु. **१८८०**/- प्रति चौ.मी. प्रस्तावित केला आहे

**(१२) नियंत्रीत सत्ता प्रकारच्या जमिनी :**

मौजे कासेगाव, ता. वाळवा येथील या संपादनामध्ये गट नं. २७२३ हा नियंत्रीत सत्ता प्रकार गट आहे.

**(१३) सरकार /गायरान जमिनी :**

मौजे कासेगाव, ता. वाळवा येथील या गट नं. ३४९० हा सरकार जमिनी (महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ) गट आहे.

**(१४) सोलॅशिअमची (दिलासा) अतिरिक्त रक्कम :**

मौजे कासेगाव, ता. वाळवा हे गांव विभाग क्र. ३ मध्ये समाविष्ट आहे. महाराष्ट्र शासन, व वनविभाग, मुंबई यांच्याकडील अधिसूचना क्र. एलक्यूएन/१२/२०१३/प्र. क्र. १९/अ-२, दिनांक २६.०५.२०१५ व क्रमांक १२/२०१३/प्र. क्र./१९०/अ-२, दिनांक २४.०४.२०१७ मधील तरतूदीनुसार भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ नुसार संपादित होणाऱ्या क्षेत्राची एकूण किंमतीत गुणक लागू केलेनंतर संपादित जमिनीची होणाऱ्या एकूण किंमतीमध्ये त्याच संपादित क्षेत्रात असणाऱ्या बांधकामे, फळझाडे, वनझाडे, विहिरी, पाईपलाईन, बोअर इत्यादीचे मुल्यांकन एकूण नुकसान भरपाई किंमतीत समाविष्ट करणेत आलेली आहे. तसेच एकूण नुकसान भरपाई किंमतीचे १००% इतकी रक्कम सोलॅशिअमची रक्कम म्हणून जमिनधारकास अतिरिक्तपणे देय करणेत आली आहे. सदर रक्कम परिशिष्ट क्र. ३ मधील एकूण नुकसान भरपाईमध्ये समाविष्ट करणेत आली आहे.

**(१५) नुकसान भरपाईची अतिरिक्त घटकाची रक्कम :**

नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम ३० (३) अन्वये संपादित क्षेत्राचे निर्धारित केलेल्या बाजारमूल्य दराने जमिनधारकाच्या संपादित क्षेत्राचा होणाऱ्या बाजारमुल्य किंमतीवर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A ची अधिसूचना प्रसिद्धी दिनांकापासून कलम ३G चा नुकसान भरपाई आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी अशा बाजारमुल्य किंमतीवर दरसाल १२% दराने नुकसान भरपाईची अतिरिक्त घटकाची (दिनांक २४.०४.२०२० ते

०४.०९.२०२३ = १२३० दिवस) रक्कम परिगणित करून ती रक्कम परिशिष्ट क्र. ३ मधील एकूण देय नुकसान भरपाई रक्कमेत समाविष्ट करणेत आली आहे.

**१६) फळझाडाचे मुल्यांकन:**

संयुक्त मोजणीनुसार मौजे कासेगाव, ता. वाळवा येथील या संपादनाखालील गट नंबरमधील जमीनीमध्ये फळझाडांचा समावेश नाही . सबब परिशिष्ट क्र. ४ निरंक आहे.

**(१७) बांधकामाचे मुल्यांकन :**

संयुक्त मोजणीनुसार संपादित क्षेत्रामध्ये येणाऱ्या घर, दुकान, हॉटेल, बांधकाम, इमारत इ. बाबींचे मुल्यांकन करणेस कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सांगली याना कळविले होते. त्या नुसार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सांगली यांचेकडील पत्र जा.क्र. साबा(प)/वि.सां. / रेशा / १७९२/२०२२ दि. २५.०४.२०२२ अन्वये प्राप्त बांधकाम मुल्यांकनाची नोंद परिशिष्ट क्र. ५ मध्ये करणेत आलेली आहे.

